**ह्या पॉलिसीमध्ये, गुंतवणूक पोर्टफोलिओमधील गुंतवणूकीची जोखीम पॉलिसीधारकाची असते.**

''युनिट लिंक्ड इन्शुरन्स प्रॉडक्ट्स हे कराराच्या पहिल्या पाच वर्षांमध्ये कोणतीही रोखीकरण सुलभता देऊ करत नाहीत. पॉलिसीधारक पाचव्या वर्षाच्या अखेरीपर्यंत युनिट लिंक्ड इन्शुरन्स प्रॉडक्ट्स मध्ये गुंतवलेले पैसे पूर्णपणे वा अंशत: सरेंडर करू वा काढू शकत नाहीत.''

## एसबीआय लाइफ - स्मार्ट वेल्थ बिल्डरच का?

तुमच्या वैयक्तिक आणि आर्थिक उद्दिष्टांची पूर्तता करण्यासाठी तुम्ही नेहमीच प्रगती करायचे लक्ष्य समोर ठेवता. तुम्ही जेव्हा तुमच्या वैयक्तिक उद्दिष्टांची पूर्तता करण्यासाठी काम करत असता, तेव्हा **एसबीआय लाइफ - स्मार्ट वेल्थ बिल्डर** तुमच्या कुटुंबाच्या आर्थिक सुरक्षेची काळजी घेईल तसेच मार्केट लिंक्ड रिटर्न्स द्वारा तुमची संपत्तीच्या निर्मितीची संधी वाढवेल.

- **संरक्षण :** अकस्मित काही घडल्यास कुटुंबाच्या आर्थिक गरजांची काळजी घेतली जाते.
- **दीर्घ मुदतीची संपत्तीची निर्मिती :** मार्केट-संलग्न उत्पन्न आणि एका वार्षिक रेग्युलर प्रीमियमच्या 125% पर्यंत गॅरंटीड ॲडिशन्सचे# लाभ एकाच वेळी शक्य करून देणाऱ्या उद्दिष्ट आधारित बचती.
- 11व्या वर्षापासून 'प्रीमियम ॲलोकेशन चार्ज' नाही.
- **लवचिकता :** ह्या प्रॉडक्ट मध्ये खालील लवचिकता मिळू शकतात :
  - o प्रीमियम्स नियमितपणे किंवा मर्यादित कालावधीसाठी भरणे किंवा एक रकमी भरणे, ह्यातून निवडीला वाव.
  - o तुमच्या जोखीम-उत्पन्न क्षमतेनुसार, तुम्ही 11 फंड पर्यायांमधून निवड करू शकता आणि ह्या फंडांमध्ये तुम्ही स्विच करू शकता.
  - o 'सेटलमेंट ऑप्शन' द्वारा एक रकमी किंवा दीर्घ कालिक हप्त्यांमध्ये डेथ बेनिफिट घेणे. सेटलमेंटच्या काळामध्ये गुंतवणुकीच्या पोर्टफोलिओतील गुंतवणुकीची जोखीम ही लाभार्थीने घ्यायची आहे.
- **रोखीकरण सुलभता :** पॉलिसीच्या 6व्या वर्षापासून पुढे किंवा जीवन विमा उतरवलेल्याने वयाची 18 वर्षे गाठल्यानंतर, ह्यातील जे नंतर असेल तेव्हापासून अंशत: रक्कम काढता येईल.
- **कर बचत**** : प्राप्तिकर अधिनियम 1961च्या प्रचलित मानदंडांच्या अनुसार.

#प्रस्तावित ॲडिशन्सच्या तारखेला पॉलिसी कार्यान्वित असल्यास 10व्या पॉलिसी वर्षाच्या अखेरीस आणि त्यानंतर दर पाच वर्षांनी फंड व्हॅल्यूमध्ये वार्षिक प्रीमियम/सिंगल प्रीमियमच्या पूर्व-निर्दिष्ट टक्क्यांनी गॅरंटीड ॲडिशन्स दिल्या जातील. पॉलिसीची मुदत जेवढी जास्त, तेवढी गॅरंटीड ॲडिशन जास्त. रेग्युलर प्रीमियम प्लॅनमध्ये 30 वर्षांची पॉलिसी मुदत निवडल्यावर कमाल 125% गॅरंटीड ॲडिशन्स उपलब्ध.


**कर लाभ आयकर कायद्यांच्या अनुसार असून वेळोवेळी बदलाच्या अधीन आहेत. तपशीलवार माहितीसाठी कृपया तुमच्या टॅक्स ॲडवायजरचा सल्ला घ्या.

## उदाहरण


**श्री संजय ह्यांनी एसबीआय लाइफ - स्मार्ट वेल्थ बिल्डर पॉलिसी मिळवली आहे. जिचे तपशील पुढीलप्रमाणे आहेत :**

| | | |
|---|---|---|
| वय - 35 वर्षे | योजनेचा प्रकार - रेग्युलर<br>प्रीमियमची पद्धत - वार्षिक | पॉलिसीची मुदत - 30 वर्षे<br>प्रीमियम भरण्याची मुदत (पीपीटी) - 30 वर्षे |
| वार्षिकीकृत प्रीमियम - ₹50,000 प्रति वर्ष | मूळ विमा राशी - ₹5,00,000 | फंड - 100% इक्विटी फंड |

1. **मॅच्युरिटी बेनिफिट (एकरकमी)** : मुदतपूर्तीच्या तारखेला, संजय ह्यांचा गृहीत गुंतवणूक रिटर्न्सवर आधारित मॅच्युरिटी बेनिफिट, खाली दिलेल्या अनुसार असेल :




2. **डेथ बेनिफिट (एकरकमी)** : संजयचा दुर्दैवाने मृत्यू झाल्यास 20व्या पॉलिसी वर्षाच्या अखेरीस, गृहीत गुंतवणूक रिटर्न्सवर आधारित डेथ बेनिफिट खालील तक्त्यानुसार आहे:




^^आकडेवारी ही उदाहरण स्वरुपाची आणि सुदृढ व्यक्तींसाठी आहे. कृपया लक्षात घ्या की वर उल्लेखलेले @4% आणि @8% प्रति वर्ष हे उत्पन्नाचे अध्याहृत दर हे सर्व लागू चार्जेस विचारात घेतल्यानंतर ह्या दरांनी हे केवळ खुलासा करणारे नमुने आहेत. ह्यांची हमी देण्यात येत नाही आणि ते उत्पन्नाची सर्वात अधिक किंवा कमी मर्यादाही नव्हेत. युनिट लिंक्ड लाइफ इन्शुरन्स प्रॉडक्ट्स ही मार्केटच्या जोखमींच्या सापेक्ष आहेत. या उत्पादनांत अंतर्गत देऊ करण्यात येणारे विविध फंड हे फंडांची नावे असून ती ह्या प्लॅन्सचा दर्जा, त्यांची भावी वाटचाल आणि उत्पन्न ह्यांचे कोणत्याही प्रकारे निर्देशन करीत नाहीत. अधिक माहितीसाठी कृपया तुमच्या पॉलिसीशी निगडित लाभाचे उदाहरण मागून घ्या.

## योजनेचा तपशील

| | | | |
|---|---|---|---|
| **प्रवेशाचे वय*** | **किमान :** 2 वर्षे[$$] | **कमाल :** 55 वर्षे | |
| **मुदतपूर्तीचे वय*** | **किमान :** 18 वर्षे | **कमाल :** 70 वर्षे | |
| **योजनेचा प्रकार** | रेग्युलर प्रीमियम/लिमिटेड प्रीमियम/सिंगल प्रीमियम | | |
| **प्रीमियम भरण्याची मुदत (पीपीटी) आणि संबंधित पॉलिसी मुदत (पीटी)** | **योजनेचा प्रकार** | **पॉलिसीची मुदत (वर्षे)** | **प्रीमियम भरण्याची मुदत (वर्षे)** |
| | **रेग्युलर प्रीमियम** | 12 ते 30 वर्षे (दोन्ही अंतर्भूत) | पॉलिसीच्या मुदती एवढी |
| | **लिमिटेड प्रीमियम पेमेंट टर्म (एलपीपीटी)** | 12 ते 14 वर्षे (दोन्ही अंतर्भूत) | 7 |
| | | 15 ते 19 वर्षे (दोन्ही अंतर्भूत) | 7/10/12 |
| | | 20 ते 30 वर्षे (दोन्ही अंतर्भूत) | 7/10/12/15 |
| | **सिंगल प्रीमियम** | 5 ते 30 वर्षे (दोन्ही अंतर्भूत) | पॉलिसीच्या प्रस्थापनेच्या वेळी वनटाइम पेमेंट |
| **प्रीमियमची रक्कम (₹100च्या पटींत)** | **योजनेचा प्रकार** | **किमान (₹)** | **कमाल (₹)** |
| | **रेग्युलर प्रीमियम (वार्षिक)** | ₹30,000 | ₹2,50,000; बोर्डाने मान्यता दिलेल्या अंडररायटिंग पॉलिसीच्या अनुसार |
| | **लिमिटेड प्रीमियम पेमेंट (वार्षिक)** | ₹40,000 | |
| | **सिंगल प्रीमियम** | ₹65,000 | |
| **प्रीमियमची वारंवारिता** | सिंगल/वार्षिक | | |
| **बेसिक सम ॲश्युअर्ड** | **योजनेचा प्रकार** | | |
| | **रेग्युलर प्रीमियम आणि लिमिटेड प्रीमियम पेमेंट टर्म** | 10 x वार्षिकीकृत प्रीमियम[1] | |
| | **सिंगल प्रीमियम** | 1.25 x सिंगल प्रीमियम | |

*वयासंबंधीचे सर्व संदर्भ हे मागील वाढदिवसाला असलेल्या वयाचे आहेत.

[$$] अल्पवयीनांच्या जीवनाच्या बाबतीत, पॉलिसीची मुदत अशी नेमकेपणे निवडायला हवी की मुदतपूर्तीच्या वेळी जीवन विमा उतरवलेली ती व्यक्ती सज्ञान वयाची असेल. अल्पवयीनांच्या जीवनाबाबत पॉलिसी सुरू व्हायची तारीख आणि जोखमीच्या प्रारंभाची तारीख समान असेल.

[1] जिथे वार्षिकीकृत प्रीमियम म्हणजे एका वर्षात लागू असलेले कर वगळता देय असणारी प्रीमियमची रक्कम.

'प्रीमियम ॲलोकेशन चार्जेस' 'पॉलिसी ॲडमिनिस्ट्रेशन चार्जेस' 'फंड मॅनेजमेंट चार्जेस' असे विविध चार्जेस कापून घेतलेले आहेत. प्रीमियम ॲलोकेशन चार्जेस आणि मॉर्टेलिटी चार्जेस वगळता सर्व चार्जेसमध्ये आयआरडीएआयच्या पूर्व अनुमतीशिवाय सुधारणा घडवणे शक्य. चार्जेस आणि त्यांचे कामकाज, ह्यांच्या संपूर्ण माहितीसाठी कृपया सेल्स ब्रोशर वाचा.

पॉलिसीच्या पहिल्या 5 वर्षांतील सरेंडर प्रकरणी, फंड व्हॅल्यू ही 6व्या पॉलिसी वर्षाच्या कामाच्या 1ल्या दिवशी देय राहील. पॉलिसीच्या 5 वर्षांनंतरच्या प्रकरणी, फंड व्हॅल्यू तात्काळ चुकती केली जाईल.

## सवलतीस प्रतिबंध

**वेळोवेळी सुधारणा केलेल्या विमा अधिनियम 1938चे कलम 41 असे नमूद करते की :**

क) भारतातील जीवन वा मालमत्ता ह्यांच्याशी संबंधित कोणत्याही जोखमीच्या संदर्भात विमा घेण्यासाठी वा त्याचे नूतनीकरण करण्यासाठी वा तो सुरू ठेवण्यासाठी कुणीही व्यक्ती विमाप्रदात्याद्वारे प्रकाशित केलेल्या माहिती पत्रक किंवा तक्त्यानुसार अनुमती देण्यात असलेली सूट वगळता, तिला देय असलेल्या पूर्ण वा अंशत: कमिशनची कोणतीही सूट कुणाही व्यक्तीला प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष आमिष स्वरूपात देऊ शकत नाही व देण्याची ऑफर दाखवू शकत नाही किंवा पॉलिसी घेणारी वा तिचे नूतनीकरण करणारी किंवा ती सुरू ठेवणारी कुणीही व्यक्ती कोणतीही सूट स्वीकारूही शकत नाही.

ख) ह्या विभागाच्या तरतुदींची पूर्तता करण्यामध्ये कुणाही व्यक्तीने हयगय केल्यास त्याला/तिला दंड होऊ शकतो, ज्याची रक्कम दहा लाखांपर्यंत विस्तारित होऊ शकते.

**Toll-free No.:** 1800 267 9090 | SMS **'LIBERATE'** to 56161 | **Email:** info@sbilife.co.in | **Web:** www.sbilife.co.in
(Between 9.00 am & 9.00 pm)

एसबीआय लाइफ – स्मार्ट वेल्थ बिल्डर एक इंडिविज्युअल, युनिट–लिंक्ड, नॉन–पार्टिसिपेटिंग, लाइफ इन्शुरन्स प्रॉडक्ट आहे.

**बनावट फोन कॉल्स आणि खोट्यानाट्या/फसव्या ऑफर्सपासून सावधान :**
विमा पॉलिसींची विक्री, बोनसची घोषणा किंवा प्रीमियमची गुंतवणूक यासारख्या उपक्रमांमध्ये IRDAI सहभागी नाही. ज्या लोकांना अशा प्रकारचे फोन कॉल्स येतील त्यांना पोलिसांकडे तक्रार दाखल करण्याची विनंती करण्यात येते.

युनिट लिंक्ड लाइफ इन्शुरन्स उत्पादने ही पारंपरिक इन्शुरन्स उत्पादनांपेक्षा वेगळी आहेत आणि त्यांच्यात मार्केट जोखीम असते. भांडवली बाजारातील गुंतवणुकींमधील जोखमींचा परिणाम युनिट लिंक्ड पॉलिसीमध्ये भरलेल्या प्रीमियमवर होऊ शकतो आणि फंडाची कामगिरी व भांडवली बाजारावर परिणाम करणाऱ्या घटकांच्या आधारावर युनिट्सची एनएव्ही वर किंवा खाली जाऊ शकते आणि पॉलिसीधारक/विमा उतरणारी व्यक्ती त्याच्या/तिच्या निर्णयांसाठी जबाबदार राहील. एसबीआय लाइफ इन्शुरन्स कंपनी लिमिटेड हे इन्शुरन्स कंपनीचे फक्त नाव आहे आणि एसबीआय लाइफ – स्मार्ट वेल्थ बिल्डर हे युनिट लिंक्ड लाइफ इन्शुरन्सचे फक्त नाव असून उत्पादनांचा दर्जा, त्यांचे भवितव्य किंवा उत्पन्न याबाबत कोणतेही निर्देश देत नाही. तुमच्या इन्शुरन्स ॲडवायझरकडून किंवा मध्यस्थाकडून किंवा विमाकाराच्या पॉलिसी डॉक्युमेंटमधून संबंधित जोखीम आणि लागू असलेले आकार यांची माहिती करून घ्या. या करारांतर्गत देऊ करण्यात येणारे विविध फंड ही फंडांची नावे असून ती ह्या प्लॅन्सचा दर्जा, त्यांचे भवितव्य आणि उत्पन्न याबाबत कोणतेही निर्देश देत नाही. फंड ऑप्शन्सची गतकालीन कामगिरी ही भावी कामगिरीची निर्देशक नाही. ह्या पॉलिसीच्या अंतर्गत देय असणारे सर्व लाभ हे कर कायद्यांच्या आणि अन्य वेळोवेळी करण्यात येणाऱ्या अन्य कायद्यांच्या सापेक्ष आहेत, तपशीलांसाठी तुमच्या टॅक्स ॲडवायझरबरोबर सल्लामसलत करा. विक्री व्यवहार पूर्ण करण्यापूर्वी जोखमीचे घटक, अटी आणि शर्ती ह्यांच्या अधिक तपशीलांसाठी कृपया विक्री माहिती पुस्तिका काळजीपूर्वक वाचा. वर प्रदर्शित ट्रेड लोगो स्टेट बँक ऑफ इंडियाच्या मालकीचा आहे व परवान्याअंतर्गत एसबीआय लाइफद्वारे वापरला गेला आहे. एसबीआय लाइफ इन्शुरन्स कंपनी लिमिटेड, नोंदणीकृत आणि कॉर्पोरेट कार्यालय : नटराज, एम. व्ही. रोड आणि वेस्टर्न एक्सप्रेस हायवे जंक्शन, अंधेरी (पूर्व), मुंबई–400 069. **IRDAI रजिस्ट्रेशन नं. 111** | CIN : L99999MH2000PLC129113.

NW/1K/Cr1/ver1/12/21/SP/MAR